# कॅब्रे डान्सर

गुरुनाथ नाईक

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B263

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**कॅब्रे डान्सर : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १९०/-

## अनुक्रमणिका

कॅब्रे डान्सर / ५
गुप्त धन / ६७
वनराज / १३९

# कॅब्रे डान्सर

# १

फोनची बेल वाजणे ही तशी नित्याचीच घटना होती. नेहमीसारखाच फारशी उत्सुकता न दाखवता बाहेर जाण्याच्या तयारीत असताना मेजवर अविनाश भोसलेने रिसिव्हर उचलला.

‘हॅलो मेजर भोसले बोलतोय.’ नेहमीच्याच थंडपणाने अविनाशने शब्द सोडले. रंजना मैत्रिणीच्या वाढदिवसाला गेली असल्यामुळे आज त्याचा संपूर्ण अर्धा दिवस कंटाळवाणा गेला होता. रात्री अकरा वाजता ती येणार होती आणि तोपर्यंत कुठे तरी वेळ घालवणे त्याला भाग होते.

‘हॅलो...मी हुसेन बोलतोय.’

‘कोण हुसेन?’

‘दिल्लीला आपले मित्र इंजिनिअर राणे आहेत...’

‘हो, आहेत.’

‘त्यांचीच चिठ्ठी घेऊन आलोय.’

‘तुम्ही उतरलात कुठं?’ अविनाशने विचारले. निदान वेळ घालवायला कुणीतरी मिळाला, हेच समाधान त्याच्या चेहऱ्यावर झळकले; पण आवाजात मात्र त्याने ते दिसू दिले नाही.

‘हॉटेल रिव्हेयरामध्ये....खोली नंबर चार.’

‘अर्ध्या-पाऊण तासात मी तिथे येईन.’ अविनाश बोलला. रिसिव्हर खाली ठेवून पुन्हा तो आरामखुर्चीत बसला. पुन्हा त्याचा चेहरा

कंटाळल्यासारखा झाला. ज्याचा फोन आला होता, तो हुसेन गंभीर वृत्तीचा असेल तर तिथे जाण्यात काही अर्थ नाही, असे त्याला वाटले.

इंजिनियर राणे आणि मेजर भोसलेची तशी फारशी दोस्ती नव्हती. संबंध चांगले होते. दिल्लीच्या मुक्कामात किमान एकदा तरी राणेला भेटावे, असे अविनाशला वाटत होते. राणेनी मुद्दाम चिठ्ठी दिली, याचाच अर्थ हुसेन ही कुणीतरी बडी व्यक्ती असावी, असाच त्याने घेतला. गंभीर प्रकृतीचा माणूस राणेशी दोस्ती करू शकत नाही, हे देखील त्याला जाणवले.

गाडी घेऊन तो निघाला. पंधरा मिनिटांत त्याची कार हॉटेल रिव्हेयरा समोर येऊन उभी राहिली. घराबाहेर पडताना नेहमीच सावध राहण्याची त्याला सवय होती. आताही तो सावध होता; पण या ठिकाणी सावधगिरी बाळगण्याचे कारण नाही, असेही त्याला वाटत होते.

त्याने चार नंबरच्या दारावरची बेल दाबली. दार उघडले गेले. गोंधळून तो समोर पाहतच राहिला. अतिशय आखूड फ्रॉक घातलेली, तारुण्याने मुसमुसलेली एक तरुणी समोर उभी होती. मादक नजरेने ती अविनाशकडे पाहत होती.

'हुसेन कोण?' भानावर आलेल्या अविनाशने शांतपणे विचारले.

'दहा मिनिटांत येतो म्हणून तो बाहेर गेला आहे... आपण कोण?'

'मेजर भोसले.' अविनाश तिच्याकडे बारकाईने पाहत बोलला. झटक्यात ती दारातून बाजूला झाली आणि अदबीने तिने अविनाशला आत बोलावले.

'त्यांचा एक जुना मित्र जवळ राहातो; पण तो मुंबईत आहे, की नाही हे पाहायला गेलेत. गेल्या महिन्यात तो सिंगापूरला जायचा होता.' तिचा आवाज अतिशय मधुर होता. तिच्या सौंदर्यासारखाच. तिचा देह चित्रकाराने रेखाटावा तसा प्रमाणबद्ध होता. मिश्कील डोळे आणि कपाळावार भुरभुरणारे केस तिच्या सौंदर्यात अधिकच भर घालत होते.

अविनाश बसला. बसावे असे त्याला वाटले. फार वर्षांनी भेटलेल्या ओळखीच्या माणसाशी बोलावे तशी ती दिलखुलासपणे बोलत होती. आयुष्यात तिने मुंबईत पाय ठेवला होता आणि मुंबई पाहून भारावून गेलेली ती तरुणी आपले मन अगदी मोकळेपणाने मोकळे करत होती.



खोलीचे दार उघडेच होते. आतल्या बाजूला कुणाच्या तरी बोलण्याचा हलका आवाज ऐकू येत होता. साडी नेसलेली एक सुंदर स्त्री दारात आली. चार-पाच वर्षाच्या गोंडस मुलाने तिचा हात पकडला होता.

'हे मेजर साहेब... या मिसेस हुसेना... मी हिची धाकटी बहीण हफीफा.' अठरा-वीस वर्षाच्या त्या तरुणीने भराभर ओळख करून दिली. खूश होऊन पुढे आलेल्या त्या तरुणीने अविनाशशी हस्तांदोलन केले. तिचे वय फार तर पंचवीस वर्षांचे असावे. सौंदर्यात ती आपल्या धाकट्या बहिणीपेक्षा सरस होती.

आणि त्याचवेळी पावलांचा दणकट आवाज अविनाशच्या कानात शिरला. भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा; पण थोराड चेहऱ्याचा एक अविनाशच्याच वयाचा तरुण घाईघाईत उघडच्या दारातून आत शिरला. भारी सूट त्याच्या अंगावर होता.

'मेजर साहेब आलेत.' खूष होऊन पुढे होत हिफाफाने त्या तरूणाला सांगितले. तिनेच दोघांची ओळख करून दिली. दोघांचे हस्तांदोलन झाले. हुसेनच्या मनगटात अमानुष ताकद आहे. याची साथ अविनाशला पटली.

दोघांच्याही गप्पा रंगल्या. हा हुसेन अगदी राणेसारखाच मनमिळाऊ स्वभावाचा होता.

'मेजर भोसले, मुंबईत आल्या आल्या कंटाळून गेलो...ओळखीचं कुणीही नाही. शिवाय काल संपूर्ण दिवस पोलिस स्टेशनात गेला.'

'पोलीस स्टेशनात?' अविनाशने गोंधळून विचारले.

'हिचा मूर्खपणा... ब्रिफकेसमध्ये पैसे ठेवलेले... हजार-दोन हजार नव्हे; सोळा हजार. बऱ्याचदा सांगितलं, येताना थोडे इकडे, थोडे तिकडे पांगून ठेव पण नाही. कितीही शिकल्या तरी अक्कल मात्र गुडघ्याच्या खाली.' कपाळावर अठ्या पडलेला हुसेन चिडून बोलत होता.

'शेवटी झालं काय? ' हुसेन थांबलेला पाहून अविनाशने विचारले.

'होणार काय? आमच्या कलकत्त्यातले चोर परवडले... गुंडगिरी अधिक आणि अक्कल कमी; पण या मुंबईत चोरांची अक्कल भारी.

हिची पर्स आणि त्याचबरोबर ब्रिफकेसदेखील त्याने पळवली. जणू काय अंतर्ज्ञानी लेकाचे.'

अविनाशने हुसेनच्या चेहऱ्याकडे पाहिले. त्याचा पडलेला चेहरा पाहून त्याला कसेसेच झाले.

वास्तविक त्याला सहानुभूती वाटण्याचे काहीही कारण नव्हते; पण कलकत्त्याहून आलेले ते कुटुंब पाहताक्षणीच त्याला आवडले होते. प्रत्येकाचा मनमोकळा स्वभाव त्याला भारावून गेला होता.

'मिस्टर भोसले, तक्रार नोंदवायला पोलीस स्टेशनात गेलो... जणू काय आम्हीच कुणाची तरी ब्रिफकेस पळवली आहे, अशारीतीने वागणूक मिळाली. आधीच उल्हास आणि त्यात हा फाल्गुन मास... नशीब आमचं. निदान तुमच्यासाठी चिठ्ठी तरी घेऊन आलो.'

हळूहळू पंधरा-वीस मिनिटांत अविनाशला सारी कहाणी समजली. हुसेना आणि हफिफा या दोघीही गाजलेल्या कॅब्रे डान्सर; पण या दोन वर्षात त्यांनी कॅब्रे सोडला होता. दोन महिन्यापूर्वी एकाएकी हुसेन मंदीच्या लाटेत सापडला आणि धंद्यात फार मोठा फटका बसलेला हुसेन कलकत्ता सोडून दिल्लीत आला; पण तिथे आपण काहीही करू शकणार नाही, हे त्याच्या लक्षात आले. या उद्देशाने निदान एखादी चांगली नोकरी तरी मिळवावी.

एखादा धंदा सुरू होईपर्यंत आपण मुंबईच्या हॉटेलमध्ये फिरून कॅबरे डान्स करू, असे दोघी बहिणी त्याला सांगत होत्या; पण हुसेनचा त्याला सक्त विरोध होता. हुसेना अविनाशच्या शेजारी येऊन बसली होती. तर इफिफा त्याच्याच उजव्या बाजूला. हुसेन मात्र शेजारच्या खुर्चीत बसला होता आणि हे गंभीर वातावरण बदलावे कसे याचा विचार मेजर भोसले करीत होता.

'मेजर साहेब, आता तुम्हीच सांगा... मी कॅब्रे डान्स करून यांना धंद्यासाठी लाखावर रुपयांचं भांडवल मिळवून दिलं. आता हे मंदीत सापडले असल्याने पुन्हा मी या मुंबईत भांडवलाची उभारणी करू शकेन. वर्ष-दोन वर्ष मला त्रास पडेल, हे मी मान्य करते... तुम्हाला काय



वाटते?' हुसेना अविनाशच्या जवळ सरकत बोलली. तिच्या या वागण्याविषयी अविनाशला शंका आली नाही. आपण एका सोशल फॅमिलीत बसलो आहोत, हीच भावना त्याच्या मनात होती.

'मिसेस हुसेना, हा सर्वांच्याच भावनांचा प्रश्न आहे... मी एकदम कोणतेही मत देऊ शकत नाही.'

'चार दिवस हॉटेलमध्ये राहायचे म्हटले तरी बिल भागवायला पैसे नाहीत. चोराला पकडून पोलीस आमचे पैसे मिळवून देतील, यावर माझा मुळीच विश्वास नाही. अशा परिस्थितीत हे एकटे काय करणार आहेत?' हुसेना चिडून बोलली. अविनाशला ते पटले; पण तरीही त्याने बोलायचे टाळले.

'मिस्टर हुसेन, विचार केला तर कोणताही मार्ग सापडतो. असं हताश होऊन तुम्ही काहीही करू शकणार नाही... फक्त आपसात भांडणं तेवढी होतील.'

'मग करू तरी काय?' हताशपणे हुसेनने विचारले.

'आजचा दिवस एन्जॉय करा माझ्याबरोबर... उद्या आपण पाहू... तुम्ही काय घेता... हॉट ड्रिंक.' अविनाशने विचारले; पण कुणालाही ते पटले नाही. बऱ्याच वेळाने गंभीर वातावरण हळूहळू निवळत गेले.

'तुम्ही काय घेता?' हफीफाने विचारले.

'मी फारसं काही घेत नाही... फार तर एखादा पेग विस्की.'

'कोणती मागवू?'

'मुंबईत सध्या तुम्ही पाहुण्या आहात आणि मी यजमान आहे.' दोघींच्या मधून उठत अविनाश बोलला. त्याने खोलीतली बेल दाबली. घाईघाईत सफेद गणवेषातील एक वेटर दारात येऊन अदबीने उभा राहिला.

'व्हिस्की, सोडा आणि लाईट स्नॅक.' अविनाशने ऑर्डर दिली.

या हॉटेलात तसा तो नवा नव्हता. हॉटेलच्या डायनिंग हॉलमध्ये शिरला असता तर त्याच्या स्वागतासाठी स्वतः मॅनेजर धावत आला असता. पण आता मात्र त्याने आपले अस्तित्व मुळीच जाणवू दिले नाही.

एकाएकी खोलीतील वातावरण पार बदलून गेले. जो गंभीरपणा होता, तो हळूहळू नाहीसा झाला. वातावरण प्रसन्न झाले. आता त्याने आपली जागा मात्र बदलली. सोफ्याच्या समोर असलेल्या खुर्चीत तो बसला.

कलकत्त्यातील कॉलेजपासून तो राजकारणापर्यंत निरनिराळे विषय टप्प्याटप्प्याने सुरू झाले. पीटर स्कॉचची बाटली आली. हफिफाने स्वतः चार ग्लास भरले. प्रत्येक ग्लासात सोडा फसफसला. हुसेनच्या मुलासाठी कोकाकोलाची बाटली आणली.

आपण कधीच घेत नाही, असे अविनाश त्यांना भासवत होता; पण अख्खी बाटली रिचवूनही शुद्धीत राहण्याची त्याची ताकद होती. दोन राऊंड झाले. हफिफाने तिसरा राऊंड भरला. ग्लासेस प्रत्येकाच्या हातात दिले. हुसेना आणि हफिफा अधिकच जवळीक करू लागल्या.

काहीतरी आठवण झाल्यासारखा अविर्भाव करीत तिसरा राऊंड संपताच हुसेन ताडकन उठून उभा राहिला.

'माफ करा मिस्टर भोसले, दहा मिनिटांत येतो.' झटक्यात तो बोलला आणि तसाच उघड्या दारातून बाहेर पडला. जाताना त्याने दार ओढून बंद केले. घाईघाईत दारापासून दूर जाणाऱ्या पावलांचे आवाज अविनाशने स्पष्टपणे ऐकले.

'बंदोपाध्यांना गाठल्याशिवाय याला चैन पडायचे नाही... दोघेही एकेकाळचे जिवलग मित्र. भेटला तर तो हुसेनला निश्चित मदत करील.' हुसेना अगदी सहजरीत्या बोलली; पण तिची जीभ अगदी जड झाली होती.

अविनाशलाही आणखी घ्यायची इच्छा नव्हती. तीन पेगमध्ये दोघीही माना टाकतील असे, त्याला वाटत होते; पण हफिफावर मात्र काहीच परिणाम झाला नव्हता. आपल्याला भरपूर चढली आहे, असेच तो भासवत होता. बोलताना त्याची जीभ अडखळत होती.

तसे पाहिले तर त्याच्यावर कोणताही परिणाम झाला नव्हता. दारू न घेतलेल्या माणसाइतकाच तो आताही शुद्धीत होता. भरपूर चढली आहे, असे भासविले तर आणखी पिण्याचा आग्रह होणार नाही, हाच त्यामागचा त्याचा विचार होता; पण अगदी उलटेच घडले होते. चौथा पेग भरून ग्लास त्याच्या हातात दिला गेला.

अविनाशच्या हातात ग्लास देऊन हफिफा त्याच्या डाव्या बाजूच्या खुर्चीच्या हातावर बसली. त्याही परिस्थितीत अविनाश गांगरला. बोलता



बोलताच हफिफाने त्याचा डावा हात पकडला. त्याच्या हाताशी खेळत ती कलकत्त्यातील गमतीजमती सांगू लागली. पिण्याकडे तिचे फारसे लक्ष नाही हे अविनाशने ओळखले. पंधरा मिनिटे झाली तरी बाहेर गेलेला हुसेन अद्याप आला नव्हता.

चौथा राऊंड संपला आणि हुसेनाने प्रथम अविनाशच्या ग्लासात पाचवा पेग भरला. ग्लास घेऊन ती अविनाशजवळ आली आणि खुर्चीच्या हातावर बसली. त्यावेळी हफिफाचा हात अविनाशच्या खांद्यावर होता आणि डाव्या हाताने ती त्याची हनुवटी कुरवाळत होती.

आजच्या इतका अविनाश कधीही सावध राहिला नव्हता. तोही हट्टाला पेटला होता. या दोघींची मजल कुठपर्यंत जाते, हेच त्याला पाहायचे होते. कुटुंब तर अगदी सोशल वाटत होते; पण इतके सोशल कुटुंब असू शकते, यावर मात्र त्याचा विश्वास बसणे शक्य नव्हते.

हुसेनाने डावा हात अविनाशच्या डाव्या काखेत घातला आणि उजव्या हाताने ती ग्लास त्याच्या तोंडाला लावू लागली. आपण अगदी कामातून गेलो असे अविनाशने भासवायला सुरुवात केली. त्यांच्यासारखंच आपणही चाळे करायला सुरुवात करावी, असे त्याला वाटले. हफिफाच्या गोऱ्यापान मांड्यांवरून हात फिरवायला त्याने सुरुवात केली आणि त्याचवेळी महिषासुरमर्दिनीची मूर्ती त्याच्या डोळ्यांपुढे दिसू लागली. पदर खोचून डावा हात कमरेवर ठेवलेली आणि उजव्या हातात लाटणे घेतलेली रंजना त्याच्या डोळ्यांपुढे येऊ लागली.

'मेजरसाब.' दोन्ही हात त्याच्या गळ्यात घालत हुसेनाने त्याला हटकले.

'अं.' अविनाशच्या तोंडून कसाबसा शब्द बाहेर पडला.

'तुमच्यासारखी देवमाणसं क्वचित भेटतात.'

'अगदी बरोबर...'

'तुमच्याकडे पाहून वाटतं...'

'काय?'

'आम्हाला तुम्ही असं वाऱ्यावर सोडणार नाही. तसे तुम्ही अतिशय श्रीमंत आहात. चाळीस-पन्नास हजार म्हणजे तुम्हाला काहीच